पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## ता. फुलंब्री जि. औरंगाबाद

नॅक मुल्यांकनात 'ब' दर्जा प्राप्त

# वार्षिक अहवाल

## शैक्षणिक वर्ष :- 2022-2023

## लहुजी साळवे बाल संस्कार केंद्र

प्राचार्य

डॉ. एस. आर .टकले

विभाग प्रमुख

डॉ. मंजुषा नळगीरकर

# लहुजी साळवे बाल संस्कार केंद्र
# वार्षिक अहवाल 2022- 2023

**लहुजी साळवे बालसंस्कार केंद्राच्या वतीने शैक्षणिक वर्ष 2022-23 मध्ये पुढील कार्यक्रम घेण्यात आले.**

## संस्कार केंद्र वस्तीचे सर्वेक्षण:

जून 2022 मध्ये लहुजी साळवे बाल संस्कार केंद्र ज्या वस्तीमध्ये चालवले जाते. अशा अण्णा भाऊ साठे नगर वस्तीतील कुंटुंबाचे सर्वेक्षण करण्यात आले.

## संस्कार केंद्र तासिका:

लहुजी साळवे बाल संस्कार केंद्राच्या तासिका 18 जुलैपासून सुरू करण्यात आल्या होत्या.जुलै, सप्टेंबर ऑक्टोबर, नोव्हेंबर, जानेवारी व फेब्रुवारी ह्या महिन्यात तासिका घेण्यात आल्या.

## बाल दिन कार्यक्रम:

दिनांक 14 नोव्हेंबर 2022 रोजी पंडित जवाहरलाल नेहरू तसेच लहुजी साळवे यांची जयंती व बालदिन असल्यामुळे संस्कार केंद्रातील लहान मुलांची वेशभूषा स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत एकूण 10 मुलांनी सहभाग घेतला. मुलांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रमाई आंबेडकर, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, झाशीची राणी, कृष्ण, राधा व लहानपऱ्या अशा व्यक्तींच्या वेशभूषा करून त्यांचे विचार मांडले.

## खेळाच्या स्पर्धा:

दिनांक 27 फेब्रुवारी 2023 रोजी संस्कार केंद्रातील मुलांच्या खेळाच्या स्पर्धा घेण्यात आल्या.धावणे, लंगडी, लिंबू चमचा, संगीत खुर्ची आणि दोरीवरच्या उड्या असे खेळ घेण्यात आले.खेळात विद्यार्थ्यांनी मिळविलेले प्राविण्य पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | खेळ | क्रमांक | मुले | मुली | छोटा गट मुले मुली एकत्र |
|---|---|---|---|---|---|
| 1 | धावणे | प्रथम | ऋषिकेश तुपे | प्रणाली तुपे | प्रणव तुपे |
| | | द्वितीय | यश तुपे | कल्याणी भालेराव | रोशनी तुपे |
| 2 | लंगडी | प्रथम | ऋषिकेश तुपे | प्रणाली तुपे | प्रणव तुपे |
| | | द्वितीय | यश तुपे | कल्याणी भालेराव | रोशनी तुपे |
| 3 | संगीत खुर्ची | प्रथम | यश तुपे | धनश्री कांबळे | रोशनी तुपे |
| | | द्वितीय | ऋषिकेश तुपे | प्रणाली तुपे | सार्थक शेजवळ |
| 4 | लिंबू चमचा | प्रथम | ऋषिकेश तुपे | कल्याणी भालेराव | प्रणव तुपे |
| | | द्वितीय | सोहम तुपे | प्रणाली तुपे | रोशनी तुपे |
| 5 | दोरीवरच्या उड्या | प्रथम | यश तुपे | धनश्री कांबळे | रोशनी तुपे |

**वार्षिक स्नेहसंमेलन संमेलन:**
लहुजी साळवे बाल संस्कार केंद्राचे वार्षिक स्नेहसंमेलन दिनांक 4 मार्च 2023 रोजी पार पडले.वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटनासाठी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री पंकज साळवे व श्री सुहास दुतोंडे हे उपस्थित होते.त्यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्नेहसंमेलनात एकूण 11 गाण्यांवर नृत्य सादर करण्यात आले. ज्यात 10 मुलांनी सहभाग घेतला होता. नृत्याच्या कार्यक्रमानंतर ज्या मुलांनी वेशभूषा स्पर्धा, खेळाच्या स्पर्धा आणि वार्षिक स्नेहसंमेलनात सहभाग घेतला अशांना डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी बक्षीस वितरण केले.

| अ.क्र | गाण्याचे बोल | सहभागी मुले |
|---|---|---|
| 1 | पहिले नमन | ऋषिकेश तुपे |
| 2 | देवा तुझ्या दारी आलो | सोहम तुपे व कल्याणी भालेराव |
| 3 | गोंधळ मांडीला | धनश्री कांबळे |
| 4 | चिऊताई चिऊताई | रोशनी तुपे |
| 5 | नदीच्या पल्याड आईचा डोंगर | साक्षी तुपे, कल्याणी भालेराव व धनश्री कांबळे |
| 6 | तो बापाचा बाप वाघ शिवबा जन्मला | प्रणाली तुपे, प्रणव तुपे, यश तुपे, रोशनी तुपे व सोहम तुपे |
| 7 | चंद्रा | धनश्री कांबळे, साक्षी तुपे व प्रणाली तुपे |
| 8 | गाडीवाला आया घर से कचरा निकाल | ऋषिकेश तुपे व यश तुपे |
| 9 | खंडोबाची कारभारीन झाली बानु | सलोनी तुपे |
| 10 | ही झुमके वाली पोर | यश तुपे व प्रणाली तुपे |
| 11 | देश रंगीला रंगीला | साक्षी तुपे, प्रणाली तुपे, कल्याणी भालेराव व धनश्री कांबळे |

**संस्कार केंद्रातील मुलांना भेटवस्तूचे वाटप:**
महाविद्यालयातील वाणिज्य विभागाचे डॉ. महेश थोरात यांनी दिनांक 17 मार्च 2023 रोजी संस्कार केंद्रातील वीस मुलांना वही, पेन व पेन्सिल अशा शालेय साहित्याचे वाटप केले.

**लहुजी साळवे संस्कार केंद्रातील तासिकांची आकडेवारी**

| अ.क्र | नाव | दिलेल्या तासिका | घेतलेल्या तासिका | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1 | डॉ. पांडुरंग कल्याणकर | 8 | 8 | 100% |
| 2 | डॉ. राजश्री पवार | 8 | 4 | 50% |
| 3 | डॉ. मंजुषा नळगीरकर | 8 | 8 | 100% |
| 4 | प्रा. विजय पांडे | 8 | 6 | 75% |
| 5 | डॉ. रामकिशन लोमटे | 8 | 4 | 50% |
| 6 | डॉ. दत्तात्रेय येडले | 8 | 4 | 50% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | डॉ. सुरेश मुंढे | 8 | 3 | 37.5% |
| 8 | डॉ. संजीव कुमार पांचाळ | 8 | 4 | 50% |
| 9 | डॉ. अश्विन रांजणीकर | 8 | 0 | 0 |
| 10 | डॉ. महेश थोरात | 8 | 6 | 75% |
| 11 | डॉ. नितीन माळेगावकर | 8 | 3 | 37.5% |
| 12 | डॉ. संदीप जगताप | 8 | 2 | 25% |

**श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री**

**रौप्य महोत्सवी वर्ष**

**लहुजी साळवे बाल संस्कार केंद्र**

# अहवाल

लहुजी साळवे बाल संस्कार केंद्र फुलंब्री गावातील मातंग वस्तीमध्ये चालविले जाते. साधारणतः तीनशे लोकांची ही वस्ती आहे. महाविद्यालय हे केवळ शिक्षण देण्याचे केंद्र नसून ते सामाजिक दायित्व मानून समाजासाठी काम करणारे संस्कार केंद्र देखील आहे. अशी उदात्त भूमिका ठेवून महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. सर्जेराव ठोंबरे यांनी २००5-२००6 मध्ये लहुजी साळवे बाल संस्कार केंद्राची निव अण्णाभाऊ साठे नगर फुलंब्री येथे ठेवली.

## उद्दिष्ट:

डॉ. सर्जेराव ठोंबरे यांची अशी मनोधारणा होती की, प्रत्येक गावांमध्ये असलेल्या दलित वस्ती वा उपेक्षित वस्त्यांमधील मुलांना योग्य संस्काराची तसेच मार्गदर्शनाची गरज आहे. म्हणून अशा मुलांसाठी संस्कार केंद्र सुरू केले तर त्यांना योग्य संस्कार मिळतील आणि शैक्षणिक प्रगती सोबतच जीवन जगण्याला योग्य दिशा ही मिळेल.कारण आजचे बालकच भविष्यातील आपल्या देशाचे आधारस्तंभ आहेत. म्हणून त्यांच्यावर सुसंस्कार करणे हे आपले सामाजिक दायित्व आहे.

## संस्कार केंद्राची सुरुवातीची अवस्था:

सामाजिक दायित्व मानून 2005-2006 साली ज्यावेळेस या ठिकाणी संस्कार केंद्र सुरू करण्याचा निर्णय महाविद्यालयाने घेतला. त्यावेळेस सुरुवातीची अवस्था फार बिकट होती. या वस्तीमध्ये नाक दाबूनच यावे लागत होते. सर्वत्र कचरा नाल्यातली घाण ही बाहेर टाकलेली होती. वस्तीतील मुलं असतील किंवा मोठी माणसं असतील त्यांच्यामध्ये स्वच्छतेचा अभाव होता. वस्तीतील केवळ एकच व्यक्ती ग्रॅज्युएट होऊन नोकरीला लागलेली होता आणि ती ही औरंगाबाद या ठिकाणी राहत होती. वस्ती मधील बहुतांश लोक निरक्षर होते आणि **थोड्या** फार लोकांचे प्राथमिक शिक्षण झालेले होते. म्हणून वस्तीमध्ये कुठल्याही प्रकारचे शैक्षणिक असे वातावरण नव्हते. वस्तीमध्ये प्रामुख्याने झाडू बनविणे व मोलमजुरी करणे हेच व्यवसाय केले जात असत. संस्कार केंद्र सुरुवातीला वस्तीमधील एका झाडाखाली भरवले जायचे. संस्कार केंद्रात येण्यासाठी सुरुवातीला लहान बालके व त्यांचे पालक तयार नव्हते. आम्ही त्या वस्तीतीलच महिला संस्कार केंद्राची समन्वयक म्हणून निवडली. ती आणि आम्ही वस्तीतील घराघरांमध्ये जाऊन संस्कार केंद्र सुरू करण्याचा काय हेतू आहे यामुळे त्यांच्या मुलांना काय काय फायदा होऊ शकतो याविषयी जाणीव जागृती निर्माण केली आणि काही दिवसानंतर हळूहळू संस्कार केंद्रात मुलं यायला लागली.

## स्वच्छतेचे महत्व पटवून दिले:

वस्तीमध्ये सुरुवातीच्या काळामध्ये प्रचंड घान होती ती स्वच्छ करायला वस्तीतली लोकं तयार होत नव्हते. म्हणून मी व आमचे महाविद्यालयाचे विद्यार्थी स्वतः वस्ती मधील घाण उचलली आणि स्वच्छता केली. सुरुवातीला त्यांनी

बघ्याची भूमिका घेतली. मात्र आम्ही हा प्रयोग दोन-तीन वेळेस केला. त्यानंतर ते स्वतः या स्वच्छतेच्या मोहिमेमध्ये सहभागी झाले.

सुरुवातीला ही मुले हात पाय न धुता, केस न विसरता फाटके कपडे घालून संस्कार केंद्रात येऊन बसायची त्यांच्याकडे पाटी पेन्सिल काही नसायचं आम्ही त्यांना हात पाय धुऊन येण्यासाठी, केस विचारण्यासाठी, स्वच्छ व शिवलेले कपडे घालण्यासाठी आग्रह धरू लागलो परंतु त्यांच्यामध्ये फारसा फरक पडत नव्हता. म्हणून आम्ही एक प्रयोग केला वस्तीच्या जवळच फुलमस्ता नदी वाहते. त्यावेळेस नदीला पाणी भरपूर असायचं आम्ही या सगळ्या मुलांना नदीवर नेऊन आंघोळ घातली त्यांचे केस विंचरले व त्यांचे फाटके कपडे शिवून अंगावर घातले व त्यांना आरशामध्ये दाखवलं की तुम्ही आता किती सुंदर दिसताय बघा. संस्कार केंद्राची समन्वयक असलेली रेखा कडे एक साबण, नेलकटर , टॉवेल आणि कंगवा आणि आरसा असं साहित्य दिलं. आणि तिथेच पाण्याची बादली भरून ठेवली. ज्या मुलांनी हातपाय धुतले नाही त्यांनी आधी हातपाय धुवायचे, केस विंचरायचे आणि नीट नेटके होऊन संस्कार केंद्रात यायचं या गोष्टीमुळे त्यांना हळूहळू स्वच्छता व नीटनेटकेपणा याची सवय लागली.

वस्तीतील लोक जवळच असलेल्या नदीच्या आजूबाजूला शौचालयासाठी जात असत. त्यासाठी आम्हाला बरीच जनजागृती करावी लागली. शासनाने घरोघरी शौचालय दिलेली होती. मग आम्ही त्या सर्व शौचालयांचा सर्वे केला किती घरांमध्ये शौचालय आहेत आणि ती वापरली जातात का? जवळपास 60 टक्के शौचालय असलेल्या घरांमध्ये त्याचा वापरच होत नव्हता. त्यामध्ये काहीतरी सामान व काड्या भरून ठेवलेल्या होत्या म्हणून आम्ही घराघरांमध्ये जाऊन ते शौचालय वापरण्यासाठी सुरू करा असे आवाहन केले. हागणदारीमुळे किती आजारांना बळी पडावे लागते याविषयी सर्व माता-भगिनींना माहिती दिली. 2014 साली सुरू झालेल्या शासनाच्या स्वच्छता अभियानाचा प्रभाव देखील वस्तीवर पडला आणि आज ती वस्ती पूर्णतः हा हागणदारी मुक्त आहे.

### संस्कार केंद्रात शिकविला जाणारा अभ्यासक्रम:

संस्कार केंद्रातील मुलांना शुद्धलेखन, बोधकथा, परिसर स्वच्छता, व्यक्तिगत स्वच्छता,पर्यावरण शिक्षण, भाषा शुद्धता, नीती पाठ, बेसिक इंग्रजी, बेसिक गणित व कम्प्युटर आदी विषय शिकविले जातात.

## संस्कार केंद्रात सुरू केलेले उपक्रम

### स्वच्छ घर व सुंदर परिसर स्पर्धा:

वस्तीतील लोकांना स्वच्छतेची सवय लागावी म्हणून स्वच्छ घर सुंदर परिसर ही स्पर्धा आयोजित करण्यात येते. ज्या व्यक्तीचे घर स्वच्छ व सुंदर असेल त्याला काही भेटवस्तू पारितोषिक म्हणून दिल्या जातात.

### रक्षाबंधन कार्यक्रम:

उपेक्षित वस्तीतील मुलांविषयी बंधू भावाची जाणीव निर्माण व्हावी म्हणून महाविद्यालयातील मुलींना दरवर्षी राखी बांधण्यासाठी संस्कार केंद्रावर बोलवले जाते.

### बाल आरोग्य तपासणी शिबिर:

**महाविद्यालयाच्या** पुढाकारामुळे वस्तीमध्ये गेल्या पाच वर्षापासून बालकांच्या आरोग्य तपासणीसाठी डॉक्टरांना बोलवून त्यांचे मार्गदर्शन बालकांना व त्यांच्या मातांना केले जाते. फुलंब्री प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर नीती म्हस्के व डॉक्टर सिकंदर शेख हे आमच्या या उपक्रमात मोलाचे सहकार्य करतात.

## संक्रांत सण साजरा करणे:

वस्तीतील महिलांशी परिचय व्हावा व एक सलोख्याचे नाते निर्माण व्हावे म्हणून संस्कार केंद्र स्थापन झाले तेव्हापासून आजपर्यंत **आम्ही** या महिलांसोबत संक्राती निमत्त तिळगुळ वाटप कार्यक्रम केला जातो. ज्यामुळे त्या महिलांची सुखदुःख कळतात.

## शालेय साहित्याचे वाटप:

संस्कार केंद्रातील मुलांना बसण्यासाठी मॅट, फळा ,बोधकथांची पुस्तके, भिंतीवर लावली जाणारी शैक्षणिक चार्ट्स, महापुरुषांची पुस्तके, खडू इत्यादी साहित्य स्वखर्चाने दिले.

वस्तीत असलेल्या पडक्या समाज मंदिरात थोडीशी स्वच्छता व डागडुघी करून 12 वर्ष संस्कार केंद्र त्या ठिकाणी चालविले.ही जागा मिळविण्यासाठी **आम्हाला** बऱ्याच ठिकाणी निवेदन द्यावी लागली सरपंचांना भेटावे लागले.

## कपडे वाटप:

**महाविद्यालयातील इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. अश्विन रांजणीकर हे मागील सहा वर्षापासून दरवर्षी संस्कार केंद्रातील पाच मुलांना कपडे घेऊन देतात.**

## क्रीडा स्पर्धा:

वस्तीतील लहान मुलांना खेळाची खूप आवड आहे. म्हणून आपण दरवर्षी धावणे, लंगडी, लिंबू चमचा, संगीत खुर्ची आदी खेळांच्या स्पर्धा घेत असतो.

## बालदिन:

14 नोव्हेंबर या दिवशी लहुजी साळवे यांची जयंती तसेच बालदिन असल्या कारणाने हा दिवस आम्ही मोठ्या उत्साहाने साजरा करतो. त्यादिवशी बालकांच्या विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम घेतला जातो.

## स्नेहसंमेलन:

स्नेहसंमेलनानिमित्त दरवर्षी पुढील कार्यक्रम घेतले जातात. कथाकथन स्पर्धा,काव्य गायन स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आणि रंगारंग कार्यक्रम ज्यात नृत्य सादरीकरण होत असते.स्नेहसंमेलनात सहभागी सर्वच बालकांना शालेय साहित्याच्या रूपाने बक्षीस दिले जाते.

## वस्तीतील लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी पुढाकार

वस्तीतील व्यक्तींच्या सुखदुःखाच्या कार्यक्रमात आवर्जून सहभाग असतो. आम्ही वस्तीतील अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न केला जातो.वस्तीला लागूनच असलेल्या जागेवर तर मंगळवारी बाजार भरतो पूर्वी अशी स्थिती होती की बाजार भरल्याच्या दुसऱ्या दिवशी त्या ठिकाणी तशीच घाण पडून राहत असे आणि त्या घाणीचा परिणाम वस्तीतील लोकांच्या आरोग्यावर होत असे. म्हणून आम्ही सरपंचांना दोन-तीन वेळेस लेखी निवेदन दिले आणि आग्रह धरला की ती घाण दुसऱ्या दिवशी स्वच्छ केली जावी. आज बाजारच्या दुसऱ्या दिवशी सगळी घाण स्वच्छ होत असते.

वस्तीतील लोकांना बऱ्याच दिवसापासून आपले एक समाज मंदिर असावे असे वाटत होते. कारण कुठल्याही प्रकारचा सार्वजनिक कार्यक्रम करण्यासाठी तिथे जागा उपलब्ध नव्हती. म्हणून आम्ही वेळोवेळी समाज मंदिरासाठी पाठपुरावा केला. श्री हरिभाऊ बागडे नानांकडे याविषयी आग्रह धरला आणि त्याचा परिणाम म्हणून नुकतेच समाज मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले आहे.
वरील सर्व उपक्रमांचा परिणाम म्हणून मातंग वस्तीमध्ये बदल घडताना दिसून येतोय.

## सर्वेक्षण अहवाल

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि महाविद्यालयाचा रौप्य महोत्सव यानिमित्ताने महाविद्यालया मार्फत चालविल्या जाणाऱ्या लहुजी साळवे बाल संस्कार केंद्रात (अण्णाभाऊ साठे नगर फुलंब्री) शिकण्यासाठी येणाऱ्या व आलेल्या 30 कुटुंबातील मुलांच्या शैक्षणिक तसेच वर्तन विषयक प्रगती संदर्भात प्रश्नावली द्वारे सर्वेक्षण करण्यात आले. सदरील सर्वेक्षणाचा अहवाल पुढीलप्रमाणे आहे.
.वस्तीमध्ये एकूण 45 घरे आहेत वस्तीची एकूण लोकसंख्या 300 च्या आसपास आहे.वस्तीतील लोकांची शैक्षणिक पार्श्वभूमी अभ्यासली असता असे आढळले की एकूण लोकसंख्येत पंचवीस टक्के व्यक्ती निरक्षर आहेत. जे साक्षर आहेत त्यामध्येही प्राथमिक शिक्षण घेतलेल्यांचे प्रमाण अधिक आहे त्या खालोखाल माध्यमिक शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण आहे. उच्च शिक्षणाच्या बाबतीत फारशी समाधानकारक स्थिती नाही पदवी शिक्षण घेतलेले केवळ 13 व्यक्तीच आहेत. वस्तीमध्ये पद्युत्तर शिक्षण घेतलेला एकमेव व्यक्ती श्री रमेश तुपे हा आहे त्यांनी इंग्लिश या विषयांमध्ये एम ए पूर्ण केलेले आहे. श्री रमेश तुपे हे आपल्या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत.
वस्ती मधील केवळ 12 व्यक्तीच शासकीय व खाजगी नोकरी मध्ये आहेत.वस्ती मधील 12 व्यक्ती सफाई कर्मचारी म्हणून फुलंब्री नगरपंचायत मध्ये काम करतात.

सदरील सर्वेक्षणात करण्यात आलेल्या 30 कुटुंबाच्या सर्वेक्षणामध्ये सर्वाधिक 25 पुरुष कुटुंब प्रमुखांनी तर 5 महिला कुटुंब प्रमुखांनी माहिती दिली. सर्वाधिक 60 टक्के कुटुंब प्रमुखाचे सरासरी वय 31 ते 40 वर्ष आहे.

**शैक्षणिक स्तर**

कुटुंबप्रमुखाचा शैक्षणिक स्तर अभ्यासला असता असे आढळले की, सर्वाधिक 17 म्हणजेच 56.67 टक्के कुटुंब प्रमुखाने माध्यमिक शिक्षण घेतलेले आहे. 5 म्हणजे 16.67 कुटुंब प्रमुखाचे उच्च माध्यमिक शिक्षण झालेले आहे. 4 कुटुंब प्रमुखाचे 13.33 टक्के प्राथमिक शिक्षण झालेले आहे. केवळ एकच कुटुंब प्रमुख पदवी पर्यंत शिकलेला आहे. निरक्षरतेचे प्रमाण सर्वात कमी 10% आढळलेले आहे.

### पालकांचा व्यवसाय:

संस्कार केंद्रातील अर्ध्या 50% पालकांचा व्यवसाय मजुरी हा आहे. त्याखालोखाल 16.67% पालकांचा झाडू बनविणे हा व्यवसाय आहे. तसे पाहिल्यास झाडू बनविणे हा मातंग समाजाचा पारंपारिक व्यवसाय आहे आणि हा व्यवसाय आजही या वस्तीतील प्रत्येक घरांमध्ये केला जातो.फुलंब्री नगरपंचायत मध्ये सफाई कर्मचारी म्हणून 3 पालक काम करतात तर 2 पालक तहसील कार्यालयात सेक्युरिटी गार्डची नोकरी करतात. हे पालक सोडल्यास उर्वरित सर्व पालक शेती, किरकोळ व्यापारी, बँड वाजविणे आदी व्यवसाय करतात.

### पालकांचे मासिक उत्पन्न:

पालकांचे मासिक उत्पन्न तपासले असता असे आढळून आले की, सर्वाधिक 80 टक्के पालकांचे मासिक उत्पन्न 10 ते 20 हजाराच्या दरम्यान आहे. केवळ13.33 टक्के पालकांचे उत्पन्न 21 ते 30 हजार दरम्यान आहे. अत्यंत अल्प

6.67 टक्के पालकांचे उत्पन्न 31 ते 40 हजार दरम्यान आहेत. याचाच अर्थ संस्कार केंद्रातील बहुतांश मुलांचे कुटुंब हे अल्प उत्पन्न गटातील आहेत.

**कुटुंबातील सदस्य संख्या:**

संस्कार केंद्रातील मुलांच्या कुटुंबातील सदस्य संख्या अभ्यासली असता, सर्वाधिक 70 टक्के कुटुंबांमध्ये 5 ते 7 दरम्यान सदस्य संख्या आहे. 23.33 कुटुंबात 2 ते 4 सदस्य संख्या आहे. उर्वरित अत्यंत कमी 6.67 टक्के कुटुंबामध्ये 8 ते 10 सदस्य संख्या आहे.

कुटुंबातील एकूण सदस्य संख्येत कमावत्या व्यक्तींची संख्या जाणून घेतली असता, जवळपास अर्ध्या म्हणजेच 46.67% कुटुंबात दोन कमावत्या व्यक्ती आहेत. त्याखालोखाल 43. 33 टक्के कुटुंबात एकच कमावती व्यक्ती आहे. उर्वरित 6.67% आणि 3.33% कुटुंबात अनुक्रमे तीन व दोन कमावत्या व्यक्ती आहेत.

संस्कार केंद्रात येणाऱ्या मुलांच्या कुटुंबातील अपत्यांची संख्या तपासली असता असे आढळले की 40% कुटुंबांमध्ये अपत्यांची संख्या तीन आहे 26.67 टक्के कुटुंबांमध्ये अपत्यांची संख्या दोन आहे. तर 10 टक्के कुटुंबांमध्ये केवळ एकच अपत्य आहे. उर्वरित 23.33% कुटुंबात तीन पेक्षा अधिक अपत्य संख्या आहे. म्हणजेच जवळपास 37 टक्के कुटुंबात मर्यादित आपत्य संख्या आहे.आपत्य संख्येमध्ये मुलाच्या 48.80% तुलनेत मुलींचे प्रमाण थोडेसे अधिक 51.20 टक्के आढळले. मुलांचा वयोगट अभ्यासला असता अर्ध्या (50 टक्के) मुलांचा वयोगट 11 ते 15 वर्ष असा होता, त्याखालोखाल 30.95 टक्के मुलांचा वयोगट 5 ते 10 वर्ष असा होता.

अण्णाभाऊ साठे वस्तीत राहणाऱ्या मुलांमध्ये सर्वाधिक म्हणजेच 52.38% मुले माध्यमिक शिक्षण घेणारी आढळली. त्या खालोखाल 39.28% मुले प्राथमिक आणि पूर्व प्राथमिक शिक्षण घेणारी आहेत. वस्तीतील सर्वाधिक 40.47% बालके के बी वानखेडे शाळेत शिक्षण घेत आहेत. 25 टक्के बालके संत सावता गुरुकुल मध्ये शिक्षण घेत आहेत. तर त्या खालोखाल 22.61 टक्के बालके भारत माता शाळेमध्ये शिक्षण घेत आहेत. सर्वात कमी 5.36% बालके जिल्हा परिषद शाळेमध्ये शिक्षण घेत आहेत. याचाच अर्थ वस्तीतील बहुतांश पालकांमध्ये मुलांना खाजगी शाळेमध्ये  टाकण्याचे प्रमाण अधिक आहे.


**नियमित उपस्थित:**

सध्या संस्कार केंद्रामध्ये 30 विद्यार्थी नियमित उपस्थित असतात. संस्कार केंद्रात उपस्थित असणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये सर्वाधिक 53.34 टक्के विद्यार्थी मागील चार ते पाच वर्षापासून संस्कार केंद्रात नियमित येतात. त्या खालोखाल 23.33 टक्के विद्यार्थी दोन ते तीन वर्षापासून संस्कार केंद्रात नियमित येतात.

**बालकांच्या वर्तनात बदल:**

संस्कार केंद्रातील अध्यापन आणि विविध उपक्रमांमुळे बालकांच्या वर्तनात काय बदल झाला असे विचारले असता पुढील माहिती मिळाली.

## बालकांच्या वर्तनात बदल





वरील आलेखावरून असे निदर्शनास येते की सर्वाधिक 16 म्हणजेच 53.33% पालकांनी असे नमूद केले की, त्यांच्या बालकांमध्ये शिक्षणाची व अभ्यासाची गोडी निर्माण झाली. त्यांना व्यवस्थितपणे लिहिता वाचता येऊ लागले. आमच्या बालकांना चांगले संस्कार मिळालेत. ते मोठ्या माणसांचा आदर करतात उलटून बोलत नाहीत व त्यांच्या संवाद कौशल्यामध्ये देखील सुधारणा झाली आहे असे 26.67 पालकांनी सांगितले. उर्वरित 20 टक्के पालकांनी संस्कार केंद्रा मार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध कार्यक्रम व उपक्रमामुळे आमच्या मुलांच्या कलागुणांना वाव मिळाला असे सांगितले.

**सामाजिक वातावरणात बदल:**

संस्कार केंद्रात मुळे लहान बालकांच्या वर्तनामध्ये जसा बदल झाला. तसेच वस्तीतील सामाजिक वातावरणात देखील सकारात्मक बदल घडवून आला. झालेला बदल हा पुढील आकृतीत दर्शविण्यात आला आहे.

## सामाजिक वातावरणात सकारात्मक बदल



वरील आकृतीवरून असे निदर्शनास येते की, सर्वाधिक 43.33% पालकांनी असे नमूद केले की, संस्कार केंद्रा मार्फत चालणाऱ्या विविध उपक्रमामुळे वस्तीतील लोकांना विविध विषयाची माहिती मिळू लागली, हळूहळू त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटू लागले आहे.
त्या खालोखाल 40% पालकांनी असे सांगितले की, परिसर स्वच्छ राहू लागला आणि वस्तीतील लोकांचा राहणीमानाचा दर्जा सुधारला. वस्तीतील लोकांमधील शिवीगाळ व भांडणे करण्याचे प्रमाण कमी झाले, असे अत्यंत अल्प 16.67% पालकांनी सांगितले.

**उपलब्धी:**

संस्कार केंद्रात येणाऱ्या जुन्या विद्यार्थ्यांपैकी चार विद्यार्थी आज शासकीय नोकरीमध्ये कार्यरत आहेत. त्यांच्या कुटुंबातील ह्या पहिल्याच व्यक्ती आहेत की ज्या शासकीय नोकरीमध्ये लागल्या आहेत. त्यांची सविस्तर माहिती पुढील तक्त्यात दर्शविण्यात आली आहे.

| **अ. क्र.** | **नाव** | **संस्कार केंद्राचे शैक्षणिक वर्ष** | **सध्या नोकरीचे पद** |
|---|---|---|---|
| 1 | **राजीव** जनार्दन तुपे | 2005-2006 | सीआयएसएफ **राजस्थान** |
| 2 | **अविनाश दशरथ तुपे** | 2006-2007 | **सीआरपीएफ जालना** |
| 3 | **पल्लवी दादाराव तुपे** | 2010-2011 | **पोलीस कॉन्स्टेबल अहमदनगर** |
| 4 | **वर्षा अशोक कांबळे** | 2010-2011 | **पोलीस कॉन्स्टेबल अहमदनगर** |

पूर्वी संस्कार केंद्रामध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी आज 1 विद्यार्थी दहावी पास आहे. 3 विद्यार्थी बारावीला शिक्षण घेत आहेत. 6 विद्यार्थ्यांनी बारावी पास केली आहे. तर 5 विद्यार्थी पदवी शिक्षण घेत आहेत.

पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## ता. फुलंब्री जि. औरंगाबाद

### लहुजी साळवे बाल संस्कार केंद्र

### कार्यक्रमाची छायाचित्रे

**बाल दिन कार्यक्रम: दिनांक 14 नोव्हेंबर 2022 - वेशभूषा स्पर्धा**






संस्कार केंद्रातील सहभागी मुले











**खेळाच्या स्पर्धा: दिनांक 27 फेब्रुवारी 2023 - संस्कार केंद्रातील सहभागी मुले**










**वार्षिक स्नेहसंमेलन संमेलन: दिनांक 4 मार्च 2023**

















**संस्कार केंद्रातील सहभागी मुले**






**बक्षीस वितरण**






## वाढदिवस अभिष्टचिंतन




## शालेय साहित्याचे वाटप

